# तासगावात नवजात बाळाचे अपहरण

■ तासगाव


**सांगली** जिल्ह्यातील तासगावमध्ये नर्स असल्याचे भासवून एका महिलेने एका रुग्णालयातून एक दिवसाच्या चिमुरड्याचे अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आज रविवारी सकाळी आठ वाजता ही घटना घडली. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. याप्रकरणी संबंधित महिलेचा पोलीस शोध घेत आहेत. तासगाव येथील सिध्देश्वर चौकातील एका दवाखान्यात एक महिला प्रसूत झाली. आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास एक महिला नर्स असल्याचे भासवून संबंधितांच्या वार्डमध्ये गेली. तेथून एक दिवसाच्या बालकाला घेऊन आपल्या काखेतील बॅगमध्ये टाकले. या बालकाला घेऊन महिलेने क्षणार्धात पलायन केले. या घटनेने रुग्णालयासह शहरात खळबळ उडाली आहे. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. संबंधित महिलेचा पोलीस शोध घेत आहेत.

# म्हाडा-पालिकेच्या वादात रुग्णालयाचे काम रखडले

■ मुंबई

**म्हाडा** प्राधिकरण व पालिका प्रशासनाच्या वादात विक्रोळी कन्नमवार नगरातील महात्मा ज्योतीबा फुले पालिका



रुग्णालय बांधणीचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. यामुळे स्थानिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळणे दुरापास्त झाले आहे.

म्हाडाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पालिकेने म्हाडाच्या आरक्षित असलेल्या चार हजार आठशे मीटर भूखंडावर १९७८ साली दोन मजली महात्मा ज्योतीबा फुले नावाचे रुग्णालय बांधले होते. आता हे रुग्णालय धोकादायक स्थितीत असल्याने गेले दोन वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. पालिकेने म्हाडाकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार रुग्णालयाच्या शेजारी असलेले म्हाडाचे दोन मोकळे भूखंड सुसज्ज रुग्णालय बांधण्यासाठी देण्यात यावेत. मात्र दोन्ही मोकळे भूखंड म्हाडा पालिकेला ताब्यात देण्यास तयार आहे. परंतु पालिकेने भूखंडाचे १५ कोटी रुपये अधिमुल्याची रक्कम म्हाडाला अदा करावी, अशी मागणी म्हाडाने केली आहे. पालिकेच्या म्हणण्यानुसार लोकसेवेच्या हिताचे कार्य म्हणून आम्हाला हे भूखंड मूल्य न घेता देण्यात यावेत.

# शहाजीराजांच्या स्मारकासाठी कर्नाटक सरकारकडून १० कोटी

■ कोरेगाव

**स्वराज्य** संकल्पक महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांच्या होदिगेरे येथील समाधी स्मारकाचा विकास करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी समाधीच्या सुशोभीकरणासाठी १० कोटींचा निधी मंजूर केला आहे. खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी केलेल्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे डॉ. कोल्हे यांनी मुख्यमंत्री बोम्मई यांचे आभार व्यक्त केले आहेत. दरम्यान, यंदाच्या शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर होदिगेरे येथील शहाजीराजे भोसले यांची समाधी दुर्लक्षित अवस्थेत असल्याची पोस्ट समाजमाध्यमांद्वारे व्हायरल झाली होती. शिवजयंतीनिमित्त व्याख्यानासाठी कागल येथे गेलेल्या खासदार डॉ. कोल्हे यांनी या पोस्टची दखल घेत या होदिगेरे येथे भेट देऊन शहाजीराजे भोसले समाधीवर नतमस्तक होऊन आदरांजली वाहिली होती. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणास्त्रोत असलेल्या महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांच्या समाधी दुर्लक्षित असणे हे योग्य नसल्याची प्रतिक्रिया देत तातडीने कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना पत्र पाठवले होते.

# सिंहगड रस्त्यावर दुकानांना आग

■ पुणे

**पुण्याच्या** सिंहगड रस्ता परिसरातील किरकटवाडी फाट्याजवळ दुकानांना आग लागल्याची घटना आज पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास घडल्याने लोकांची धावपळ उडाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही. गॅस गळतीमुळे आग लागली असावी, असा अंदाज आहे.

किरकटवाडी फाटा येथे केंद्रीय जल व संशोधन केंद्राच्या जागेवर अनधिकृतपणे दुकाने थाटून ती दुकाने भाड्याने देण्याचे प्रकार सुरू आहेत. अशातच रविवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास येथे असणाऱ्या श्रीनाथ स्विट होम, महाराष्ट्र मटन शॉप व सायबा अमृततुल्य या दुकानांना अचानकपणे आग लागली. या आगीत या तीनही दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे.

पहाटे या दुकानांना आग लागल्याचे एका नागरिकाने अग्निशमन दलाला सांगितले. त्यानंतर पीएमआरडीएच्या नांदेड सिटी येथील अग्निशमन दलाच्या जवानांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात आणल्याने मोठा अनर्थ टळला.

# फरार राजेन व हिरेन ध्रुव यांना शोधून न्यायालयात हजर करा

**हायकोर्टाचे मुंबई पोलीस आयुक्तांना आदेश**

■ मुंबई

**न्यायालयासमोर** आत्मसमर्पण करण्याचे आदेश देऊनही पळून जाणाऱ्या दोघा व्यावसायिकांना शोधून न्यायालयात हजर करा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई पोलीस आयुक्तांना दिले आहेत. राजेन ध्रुव आणि हिरेन ध्रुव अशी फरार झालेल्या व्यावसायिकांची नावे असून त्यांची बँक खाती गोठवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

न्यायमूर्ती के.आर श्रीराम आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने संबंधित बँका आणि वित्तीय संस्थांना या दोन्ही व्यावसायिकांची खाती गोठवण्याचे, त्यांचे विविध मार्गाने केले जाणारे बँक व्यवहार थांबवण्याचे आदेशही दिले आहेत. ऑर्बिट व्हेंचर डेव्हलपर्सचे राजेन व हिरेन या व्यावसायिकांचा ॲक्सिस फायनान्स लिमिटेडशी वाद झाला होता. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राजेन व हिरेन या दोघांना दोषी ठरवत सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. त्यानंतर या दोघांनी सहा हप्त्यांमध्ये १०२ कोटी रुपये फेडणार असल्याची तसेच खार पश्चिम येथील सदनिका अन्य कोणालाही विकणार नाही अशी हमी न्यायालयाला दिली होती. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली. मात्र दिलेल्या हमीचे पालन केले नाही म्हणून न्यायालयाने या दोघांना अवमान प्रकरणी दोषी ठरवून त्यांना सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. तसेच दोघांनी न्यायालयासमोर अभ्यर्पण करावे, असे आदेश दिले होते. परंतु दोघेही न्यायालयासमोर हजर होण्याऐवजी फरार झाले.

या प्रकरणी शुक्रवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी हे दोन्ही व्यावसायिक फरार झाल्याची माहिती त्यांच्याच वकिलांनी न्यायालयाला दिली. त्यांचा काहीही ठावठिकाणा लागत नसून त्यांचे भ्रमणध्वनीही बंद असल्याचे वकिलांनी न्यायालयाला सांगितले. त्यानंतर या दोन्ही व्यावसायिकांना शोधून त्यांना अटक करावी व न्यायालयासमोर हजर करावे.

## (अनुसूची)
## फॉर्म ए
## जाहीर उद्घोषणा

*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)*

**अव्हेस्ट्रा केमिकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | अव्हेस्ट्रा केमिकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १७.११.२००९ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U51900MH2009PTC197094 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ६११, रिलायबल बिझनेस सेंटर कमर्शियल प्रिमायसेस को-ऑप. सोसा., आनंद नगर, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई - ४०० १०२. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | २०.०७.२०२२ (आदेश आयआरपी यांना २२.०७.२०२२ रोजी सूचित करण्यात आला) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | १८.०१.२०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. विमल कुमार अग्रवाल IBBI/IPA-001/IPP00741/2017-2018/12247 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. ४, तळ मजला, सी विंग, शांती ज्योत इमारत, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनसमोर, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ईमेल : vimal@vpagrawal.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. ४, तळ मजला, सी विंग, शांती ज्योत इमारत, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनसमोर, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ईमेल : cirp.avestra@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०५.०८.२०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम(६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही. |
| १३. | वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल: | (अ) https://ibbi.gov.in/downloadform.html (ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक २०.०७.२०२२ रोजी अव्हेस्ट्रा केमिकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

**अव्हेस्ट्रा केमिकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह ०५.०८.२०२२ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

**अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी: विमल कुमार अग्रवाल**
**दिनांक आणि ठिकाण: दि. २५.०७.२०२२ मुंबई**

## SBI
## भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०७१२२७३८ | अजीत कुमार सरकार | ६०० | २३६८१७ | २३६८१७ | ७४६३८५३२२१ | ७४६३८५३८२० |
| २ | ०१८३११२८ | ओमप्रकाश लड्ढा | ५०० | १५५७९५ | १५५७९५ | ७४२४६१८३७१ | ७४२४६१८८७० |
| ३ | ०१०९६८१७ | अनुज गुप्ता | ५०० | ११५६४३ | ११५६४३ | ७४०४११०००१ | ७४०४११०५०० |
| ४ | ००७८९७७५ | सुरेखाबेन गिरीशकुमार शाह<br>गिरीशकुमार वल्लवदास शाह | ९०० | ५८१२५ | ५८१२५ | ७३८७२४७३६१ | ७३८७२४८२६० |
| ५ | ०३०३१९५१ | कार्तिक श्रीनिवासन | ६०० | २१०४२५ | २१०४२५ | ७४५२७७३१३१ | ७४५२७७३७३० |
| ६ | ०१४६००८६ | कार्तिक राम श्रीविवासव | ६०० | १३३९२१ | १३३९२१ | ७४१३३००४२१ | ७४१३३०१०२० |
| ७ | ०७५०५५४३ | भारत भूषण चावला | ४७६ | ६३०५६०७ | ६३०५६०७ | ८०५१०३१५६७ | ८०५१०३२०४२ |
| ८ | ००९०५९२३ | अर्चना दास<br>सुभब्रत घोष | ५०० | १०१७७८ | १०१७७८ | ७३९८०५९००१ | ७३९८०५९५०० |
| ९ | ००८०२४७६ | आनंद लाल<br>राम दुलारी देवी<br>संजीत कुमार तुना | ६३० | ६२७६७ | ६२७६८ | ७३८८३९२४७१ | ७३८८३९३१०० |
| १० | ००९०५९२४ | सुभब्रत घोष<br>अर्चना दास | ५०० | १०१७७९ | १०१७७९ | ७३९८०५९५०१ | ७३९८०६०००० |
| ११ | ०२२५७४६३ | राज कुमार झा<br>अमिता झा | ६०० | १८५२६० | १८५२६० | ७४३९७६८०५१ | ७४३९७६८६५० |
| १२ | ०२१४२९८२ | सी के रामन | ५०० | १७५२५९ | १७५२५९ | ७४३४५८१२५१ | ७४३४५८१७५० |
| १३ | ०१०२७८५४ | पार्वती राजाराम<br>उषा टी आर | ८१० | १११९६५ | १११९६६ | ७४०२०५४०२१ | ७४०२०५४८३० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई — समभागांची संख्या: ७७१६ — महाव्यवस्थापक
**दिनांक:** २५.०७.२०२२ — स.प्रमाणपत्रांची संख्या: १५ — (शेअर्स व बॉण्ड्स)

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **कमलप्रीत सिंग तेजिंदर सिंग नारंग ("मालक")** हे प्लॉट क्र. ४८, ४९ आणि ५०, एव्हरशाईन नगर, मार्वे रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ येथे स्थित असलेल्या आणि वसलेल्या 'मनाली बिल्डींग नं. २ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.', (**सदर संस्था**) मधील सदनिका क्र. २२, २ए विंग (**"सदर सदनिका"**) व त्यासह संस्थेच्या इमारतीमधील आच्छादित गॅरेज क्र. जी२ (**"सदर गॅरेज"**) व त्यासह सदर संस्थेद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. १० अन्वये पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. ४६ ते ५० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- च्या ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग (**"सदर समभाग"**) चे धारक आणि ताबेदार आणि/किंवा "त्याचे मालक" असे चांगले आणि पुरेसे हक्कदार आहेत. सदर सदनिका आणि सदर समभाग याखाली लिहिलेल्या **अनुसूची** मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केले आहेत.

मालकांनी मला असे सूचित केले आहे की, शीर्षकामधील त्यांचे पूर्ववर्ती (१) **तेजिंदर सिंग एच.एस. नारंग (२) सौ. गिंदर कौर टी. एस. नारंग (दिवंगत) ("मूळ मालक")**, यांनी सदर सदनिका आणि सदर गॅरेज व्ही. के. दालमिया यांच्याकडून दिनांक ४ फेब्रुवारी, १९८८ रोजीच्या करारपत्रानुसार ("सदर करारपत्र") खरेदी आणि संपादित केली होती.

मला मालकाद्वारे पुढे असे सूचित करण्यात आले आहे की, मूळ शीर्षक कागदपत्र म्हणजेच दिनांक ४ फेब्रुवारी, १९८८ रोजीचे करारपत्र सदर मालकाच्या ताब्यातून हरवले आणि/किंवा गहाळ झाले आहे आणि ते अत्यंत परिश्रमपूर्वक शोधून देखील सापडत नाही.

मालकाद्वारे मला पुढे असे सूचित करण्यात आले आहे की, मालकाने सदर मूळ करारपत्र हरविल्याबाबत बांगुर नगर पोलीस स्थानक, ठाणे येथे तक्रार आणि नोंद दाखल केली आहे.

सदर सदनिका/गॅरेज/समभागाशी संबंधित सदर करारपत्रासह कागदपत्रांसोबत कोणताही व्यवहार करू नये असे जनतेस खबरदार करण्यात येते, आणि कोणी व्यक्ती ती स्वीकारत असल्यास किंवा व्यवहार करत असल्यास त्यांनी तसे त्यांच्या स्वतःच्या जोखीम आणि जबाबदारीवर (गुन्हेगारी दायित्वासह) करावे आणि अशा कोणत्याही अनधिकृत व्यवहारामुळे अशा व्यक्तीस होणाऱ्या कोणत्याही नुकसानीकरिता कशाही पद्धतीने माझे अशील जबाबदार असणार नाहीत.

उपरोल्लेखित कागदपत्रे कोणा व्यक्तीच्या ताब्यात आल्यास आणि/किंवा कोणी व्यक्ती ज्यास/ज्यांना ती कागदपत्रे कुठे आहेत त्याबाबत माहिती असल्यास त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या ४, स्टॅनबर्ग इस्टेट, तळ मजला, जुहू कोळीवाडा, जुहू आझाद रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००४९ येथील कार्यालयात आजच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे.

**वरील उल्लेखित अनुसूची**

सदनिका क्र. २२, २ए विंग, मनाली बिल्डींग नं. २ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ४८, ४९ आणि ५०, एव्हरशाईन नगर, मार्वे रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ व त्यासह संस्थेच्या इमारतीमधील आच्छादित गॅरेज क्र. जी२ व त्यासह सदर संस्थेद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. १० अन्वये पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. ४६ ते ५० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- चे ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग.

मुंबई, दि. २५ जुलै, २०२२

**विलप्रीन कौर**
**वकील**

## PUBLIC NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN TO ALL CONCERNED that **(1) MR. VIKRAMJIT SINGH VIRDI Son of MR. HARJIT SINGH VIRDI** and **(2) MRS. SURINDER KAUR VIRDI Wife of MR. HARJIT SINGH VIRDI,** being Sole and Absolute Owners of Residential Flat, bearing Flat No. 1, Presently Admeasuring About 421 Square Feet of Carpet Area on the Ground Floor of the Building known as JUHU RADHIKA of THE JUHU RADHIKA CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, Situated at Samarth Ramdas Marg, 10th Road, J.V.P.D Scheme, Juhu, Mumbai – 400 049, on Plot of land bearing Sub-Plot No. 3 of Plot No. 3, C.T.S. No. 196 (Part) of Revenue Village Juhu, Taluka Andheri, Mumbai Suburban District, with the Consent and Confirmation of the Society have agreed to Sell, Assign and/or Transfer their Respective Beneficial Right, Title, Claim Interest, Future Entitlements with Vacant and Uninterrupted Physical Possession of said Flat No. 1, Ground Floor and Benefits Incidental to **05 (Five) Shares** of the Society, Comprising of Share Certificate No. 1, For 05 (Five) Shares bearing Distinctive Nos. From 001 to 005, in Favor of my Clients for Valuable Monetary Consideration.

That the said Proposed Vendors/Transferors, are Claiming Ownership, Concerning the said Premises in Society, on the strength of Registered Agreement For Sale, Dated 5th December, 2014, (Registered Under Serial No. BDR-1/ 9425/2014), From Predecessor-in-Title MESSERS AYYAPPA CONSTRUCTION CO. who in Turn Acquired/Purchased the said Premises, From SHRI NARESH KUMAR MALHOTRA, Pursuant to Duly Registered Agreement For Sale Dated 21st July, 2006, (Registered Under Serial No. BDR-4/ 5608/2006), and Proposed Vendors/Transferors have been Enrolled as Transferees (Members) of said Society, in the manner described hereinabove.

The Proposed Vendors/Transferors have No Formal Chain Document (s) or Agreement (s) with the Original Builders/ Promoters/Developers and Subsequent Allottee (s) or Transferee (s), whom Society Enrolled as Member (s) From time to time SAVE AND EXCEPT, 2 (Two) Chain Agreements described hereinabove and the Proposed Vendors/Transferors have Not Collected such Possible Previous Chain Agreement (s) From Previous Owner.

THEREFORE ANY MEMBER OF PUBLIC or Authority, having any Objection or Claim against the said Present Owners Entering into Deed of Sale/Transfer, in Favour of my Clients, against Valuable Monetary Consideration, in any manner Howsoever and Whatsoever by way of Sale, Gift, Lease, Mortgage, Charge, Exchange, Leave and License, Tenancy or Lease in Perpetuity, or any Legitimate Claim Under Succession Act or any Civil or Criminal Litigations or Recovery Proceedings as an Arrears of Land Revenue by the Competent Authority appointed Under the Relevant Act, Should Intimate the same to the Undersigned with Legitimate Documentary Evidences at the Address Recorded hereunder **within 14 (Fourteen) DAYS From the Date of Publication hereof,** Failing which My Clients(Proposed Purchasers / Transferees) will Complete the Deal by making Payment of Entire Agreed Consideration and Proceed Further including Obtaining Possession of said Flat as well as Society Transfer (Enrollment) Formalities, Ignoring any such Claims or Proceedings or Objections (if any) and will have Reason to believe that any such Claim(s) IF ANY are Waived and/or Abandoned.

**Dated**: 25th Day of July, 2022.

Sd/.
**MRS. FALGUNI ABHAY PATEL**
**Advocate**
3/A, Sumangal Apartment,
Vallabhbhai Road, Vile Parle (West),
Mumbai -400056

## सिडको
शहरांचे शिल्पकार

## बोली मागविणारी सूचना

**एनएमआयए प्रकल्पाअंतर्गत पुष्पक नगर, नवी मुंबई येथे सेक्टर-१ ते १० मध्ये ३३/११ केव्ही रिसिव्हींग सबस्टेशन्स आणि ११/०.४ केव्ही सबस्टेशन्सची दुरुस्ती**

महाराष्ट्राची सिडको मर्यादीत खाली नमूद केलेल्या कामाकरिता सिडको मर्या. किंवा केंद्र शासन, किंवा महाराष्ट्र राज्य शासन आणि त्यांच्या उपक्रमांमध्ये उचित वर्ग आणि श्रेणीमध्ये नोंदणीकृत असलेल्या, अनिवार्य पात्रता निकष पूर्ण करीत असलेल्या, **कोणत्याही प्रकारच्या इमारत संरचना किंवा कोणत्याही प्रकारच्या इमारतीच्या बांधकामाची दुरुस्ती** यांसारखी तत्सम स्वरुपाची कामे पूर्ण केली आहेत अशा अनुभवी संभाव्य बोलीदारांकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे **"ऑनलाईन" बाब दर शतमान बोली** मागवित आहेतः

**१) कामाचे नावः एनएमआयए प्रकल्पाअंतर्गत पुष्पक नगर, नवी मुंबई येथे सेक्टर-१ ते १० मध्ये ३३/११ केव्ही रिसिव्हींग सबस्टेशन्स आणि ११/०.४ केव्ही सबस्टेशन्सची दुरुस्ती २) सी. ए. क्र.:** ०२/सिडको/ईई(एपी-III)/२०२२-२३. **३) बोलीस लावण्यात आलेली किंमतः** ₹ ६५,३१,६९४.८६/- **४. ई.एम.डी.:** रु. ६६,०००/- **५. नोंदणीकरण वर्गः** वर्ग - IV (ए) आणि त्यावरील **६. पूर्तता कालावधीः** १५० (एकशे पन्नास) दिवस (पावसाळा समाविष्ट) **७. निविदा प्रक्रिया शुल्कः** रु. ५,९००.०० (१८% जीएसटी समाविष्ट (ना-परतावा))

बोली कार्यक्रमासह बोली प्रपत्रे दि. २६.०७.२०२२ रोजी १७.०१ वाजेपासून वेबसाईट mahatenders.gov.in वर उपलब्ध होईल.

**अधीक्षकीय अभियंता**
**(विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१७०/२०२२-२३

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०२१-२२ लेखाशिर्षकांतर्गत ठाणे महानगरपालिका प्र.क्र. १८ जवळ जेष्ठ नागरीक कट्टा तयार करणे व दिशासुचक फलक (डिजिटल) बसविणे. या कामासाठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.ज्या कंत्राटदारांविरुदध शासकिय/ निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे.अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि.२५/०७/२०२२ दि.०८/०८/२०२२ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे ०८/०८/२०२२ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.निविदा दि.१०/०८/२०२२ सायं.१६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-वागळे/ ३८३/२२-२३ सही/-
दि:२२.०७.२०२२ — कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* — ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

"कोविड लसीकरण अमृत महोत्सव"
बुस्टर डोस घ्या ..व सुरक्षित रहा !

## MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

Online E-Tenders with schedules filled are invited from Vendor registered with MSEDCL for supply of various testing equipments as mentioned below.

| Tender No. | Description | Estimated Cost in Rs. (Lakhs) | Tender fee | E.M.D Rs | Last date of Submission |
|---|---|---|---|---|---|
| T-01 | E-Tender for Procurement of Various Testing Equipments for Testing Divisions under Konkan Region | 49.56 | Rs. 2500/- + 18 % GST | 1 % of tender value | 17.08.2022 up to 23:50 Hrs. (only on website) |

E-Tender: JMD/KONKAN /OP/T-01/ 2022-23; documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ from **10:00** Hrs on **25.07.2022 to 18:15 Hrs.** on **12.08.2022.** The last date of bid submission on E-tendering website is up to **23:50 Hrs on 17.08.2022.**

**SE (Operations),**
**Konkan Region, Kalyan**

Office of the Joint Managing Director Konkan Regional Office
Plot No. D 1/2, Baravegaon Road, Godrej Hill, Kalyan (West). 421301 Ph: (0251)-2235151 (0), E-mail: jmdkonkan@gmail.com.

## वांद्रे अहिंसा नगर को-ऑप. हौसिंग सोसा. लि.

**नोंद. क्र. बीओएम (डब्ल्यू.एच/ई)/एचएसजी (टी.ओ)/६२४५/९२**

**सी.एस. क्र. ६२९ (भाग), न्यू इंग्लिश स्कूलजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**उप विधीनुसार वर्ष २०२२-२३ ते २०२६-२७ या ५ वर्षांच्या मुदतीकरिता एकूण १५ जागांसाठी संस्थेच्या नवीन व्यवस्थापन समितीची निवडणूक घेण्याकरिता उपरोल्लेखित संस्थेचा** निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | टप्पा | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | निवडणूक कार्यक्रमाच्या उद्घोषणेचा दिनांक | २४.०७.२०२२ | स. ११.०० | संस्थेचा सूचना फलक |
| २. | अर्ज क्र. ई-५ मध्ये नामनिर्देशन करण्याकरिता अंतिम दिनांक | २५.०७.२०२२ ते २९.०७.२०२२ | स. ११.०० ते दु. १.०० दरम्यान | संस्थेचे कार्यालय |
| ३. | प्राप्त झालेल्या नामनिर्देशन करण्याचा अंतिम दिनांक | २९.०७.२०२२ | दु. २.०० | संस्थेचा सूचना फलक |
| ४. | नामनिर्देशनाच्या छाननीचा दिनांक | ३०.०७.२०२२ | स. ११.०० वाजता सुरु | संस्थेचे कार्यालय |
| ५. | छाननीनंतर वैध नामनिर्देशनाची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | ३०.०७.२०२२ | छाननीपश्चात | संस्थेचा सूचना फलक |
| ६. | अर्ज ई-६ मध्ये उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक | ३१.०७.२०२२ ते १४.०८.२०२२ | स. ११.०० ते दु. १.०० दरम्यान | उमेदवाराने निवडणूक अधिकाऱ्याकडे वितरीत करावे |
| ७. | निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्याचा आणि निवडणूक चिन्ह वाटप करण्याचा दिनांक | १४.०८.२०२२ | दु. २.०० | संस्थेचा सूचना फलक |
| ८. | विशेष सर्वसाधारण सभा, ज्यामध्ये मतदान घेण्यात येईल किंवा बिनविरोध निवडीची घोषणा होणार त्याचा दिनांक, वेळ आणि ठिकाण | २१.०८.२०२२ | स. ११.०० | संस्थेच्या जागेमध्ये |
| ९. | मतमोजणीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण | २१.०८.२०२२ | मतदानानंतर | संस्थेच्या जागेमध्ये |
| १०. | मतदानाचा निकाल घोषित करण्याचा दिनांक | २१.०८.२०२२ | मतमोजणीनंतर | संस्थेच्या जागेमध्ये |

सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी की, निवडणुकीकरिता संस्थेच्या सर्व सदस्यांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि. २१ ऑगस्ट, २०२२ रोजी स. ११.०० वाजता वरील अ. क्र. ८ ते १० मध्ये उल्लेखिल्यानुसार संस्थेच्या जागेमध्ये मतदानाकरिता, आवश्यक असल्यास आणि/किंवा बिनविरोध निवडणुकीच्या घोषणेकरिता, आवश्यक असल्यास आणि/किंवा मतदानाचे निकाल घोषित करण्याकरिता घेण्यात येणार आहे.

सही/-
(अनिल परब)
शासकीय यादीमधील निवडणूक अधिकारी
एम्पॅनेलमेन्ट क्र. डीजेआर/२२८-२०२१
मुंबई विभाग

दिनांक: २४ जुलै, २०२२
ठिकाण: मुंबई